"संत कबीरांचे मानवतावादी शिक्षण - एक अभ्यास".

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीच्या पूर्तीसाठी सादर केलेला अहवाल

संशोधक

बोधनकर मनोजकुमार अंबादास

एम. ए. (हिंदी), एम.एड., एम.फिल. (शिक्षणशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. शिराढोणकर

प्राचार्या,

रावसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय, पाचपिंपळी

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सन २०१७-१८

१.१ प्रस्तावना

मानव जो काही घडतो त्यास कारणीभूत सभोवतालचे वातावरण असते. अतः व्यक्ती संबंधी विश्लेषण किंवा आकलन करण्यास त्याचे सामाजिक संबंध, सामाजिक वातावरण इ. सामाजिक घटकांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. सामाजिक प्राण्याच्या रुपात व्यक्ती समाजामध्ये राहतो.

कबीर युग संचालनाच्या अजस्त्र क्षमतेने ओतप्रत व्यक्तित्वाच्या रुपाने काळ आणि देशाच्या रणभूमीवर अवतरीत झाले.

कबीरांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्त्व अभ्यासण्यासाठी तत्कालीन सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकिय इतिहास अभ्यासणे अत्यंत आवश्यक आहे.

कबीराचा जन्म विक्रम संवत १९२५ अर्थात इ.स. १३६८ मध्ये तथा मृत्यु संवत १५०५ अर्थात इ.स. १४४८ मध्ये झाला असे मानला जातो.

हया काळातील आर्थिक, राजकिय, धार्मिक तथा सामाजिक परिस्थिती तसेच विचारप्रवाह यांचा प्रभाव कबीरच्या जीवन, व्यक्तिमत्व आणि विचारांवर आवश्यक होता.

१.कबीर कालीन आर्थिक परिस्थितीः-

कबीर कालीन समाजात आर्थिक विषमतेने अत्यंत विक्राळ रुप धारण केले होते. व्यक्तिचा दर्जा त्याच्या आर्थिक क्षमतेवर अवलंबित होता. कबीर तत्कालीन परिस्थितीचे वर्णन करतांना सांगतात.....

काहू दीन पाट पटंबर काहू पलघ निवारा

काहू गरी गोदरी नाही काहूखान परारा

यावरून लक्षात येते की, राजे, सरदार, सावकार हे श्रीमंत ऐश्वर्याचे जीवन जगत होते तर गरीब-निर्धन व्यक्तीला दोन वेळचे जेवण ही मिळणे कठिण होते.

१. कृषी उत्पादनः-

तांदूळ, ऊस, गहू, कापूस, जव, राइ इ. उत्पादन घेतले जात असत.

२. राजस्व(कर):-

जकात, स्वराज, जजिया व खमून इ. कर वसूल केला जात असे.

३. उद्योगः-

i) कृषीवर आधारितः-

सूतकताई, गूळ बणविणे, नीळ बणविणे, तेल काढणे, दोरी बनविणे, मद्य, अत्तर, रेशम इ.

ii) अन्य उद्योगः-

धातू, चमडा, कागद, काच, मिठ इ.

२. कबीर कालीन राजकिय परिस्थितीः-

कबीरांचा काळ राजकिय अव्यवस्थेचा व अशांततेचा काळ होता. इ.स. १३९८-९९ च्या काळात तैमूरलंगने आक्रमण केले. दिल्लीच्या राजसत्तेत अनेक स्थित्यंतरे घडून आली. त्यांनतर तुघलक वंशाची सत्ता दिल्ली वर आली. तुघलकानंतर लोदी घराण्याची स्थापना होऊन दिल्लीची राजसता लोदी घराण्याकडे आली.

तत्कालीन राजवैभवाचे वर्णन करतांना कबीर म्हणतातः-

राज पाट स्यंघासण आसण, बहु सुंदरि रमणॉ
चंदन चीर कपूर बिराजत, अंति तऊ मरणाँ

राजशासकांजवळ विशाल भू-प्रदेश, अपूर्व ऐश्वर्य, राजपाट सिंहासन, आसन, महाल, सुंदर-सुंदर रमणियाँ आणि विलासाची प्रत्येक सामग्री उपलब्ध होती.

३. कबीर कालीन धार्मिक परिस्थिती:-

कबीर काळात भारतीय समाजामध्ये वैदिक, शैव, शाक्त, वैष्णव, बौध्द, जैन तथा इस्लाम धर्म प्रचलित होते. तत्कालीन परिस्थिती मानवाला सन्मार्गाने मार्गदर्शन करणा-या धर्म, पंथ व संप्रदायचे विकृती व विसंगती निर्माण झाली होती.

समाज तथा व्यक्तीला प्रेम तथा मैत्रीचा संदेश देणा-या धर्म-संप्रदायांमध्ये शत्रूत्व व द्वेष होता.

इस्लामच्या आगमनाचा हिंदू धर्मावर व्यापक प्रभाव पडला. तीर्थ, व्रत, उपवास, यज्ञ-हवन धर्माचे केंद्रबिंदू बनले.

कबीरांच्या काळात विशेषत: काशी तीर्थस्थानी अनेक विविध संप्रदायाच्या योगी व साधकांनी आपली मठ निर्माण केली होती. ज्यामध्ये खरे कमी व ढोंगी अधिक होते.

जेता मीठा बोलना, तेता साध न जाती

पहली याद दिखाई करि, उँडै देसी ऑणि

अशा प्रकारे कबीरांनी ढोंगी व पाखंडी साधूंवर कडाडून टिका केली.

४. सामाजिक परिस्थिती:-

तत्कालीन सामाजिक वातावरण विकृती आणि विसंगतिने युक्त होता. धार्मिक अवडंबर, राजकिय अव्यवस्था आणि धर्मान्धता हयामूळे समाजाचे

स्वरुप कोलमंडले होते. हिंदू आणि इस्लाम हया विभिन्न संस्कृतीच्या पारस्पारिक प्रभावाने एक नविन सामाजिक रचनेची निर्मीती झाली.

हिंदू समाज वर्ण, जाती आण्णि उच्च नीच्च अशा भेंदामूळे विभक्त झाला होता. वर्णव्यवस्था अत्यंत कठोर आणि घृणास्पद रुप बनले होते. शूद्रांना सूद्धा अस्पृशांची वागणूक दिली जात असे. समाजामध्ये ब्राम्हणांना अधिकार प्राप्त होते.

इस्लामच्या प्रभावामुळे हिंदू धर्माला तडे जाऊ लागले. कारण इस्लाम धर्माच्या समता एवं भातृत्वच्या सिध्दान्तामूळे निम्न,शूद्र व अस्पृश्य समजल्या जाणा-या जाती, इस्लाम धर्माचा स्विकार करु लागल्या होत्या.

कबीर जीवनचरित्रः-

मध्ययुगीन काळात म्हणजे समाज अज्ञान, अंधश्रध्दा, कर्मकांड, जातीभेदाभेद, उच्च-निच्चता, आर्थिक विषन्नता, मुस्लीम सत्तेचे शोषण हया समयी कबीरांनी आपल्या वाणीने समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. मध्युगकात वैज्ञानिक दृष्टीकोन व मानवतावादी मूल्यांचे शिक्षण देणारे एक महान समाजशिक्षक होते.

अन्य संत महापुरुषांप्रमाणेच कबीर यांच्या जीवन-चरित्रा विषयी विश्वसनीय प्रमाण तथा सर्वमान्य तथ्य आजही उपलब्ध नाही. कबीरांचा काळ, जाती, जन्मस्थान, जीवनवृत्त, इ. विवादांचे विषय बनले आहेत.

कबीराचा जन्म विक्रम संवत १९२५ अर्थात इ.स. १३६८ मध्ये झाला. कबीरांच्या जन्माविषयी अशी अख्यायिका सांगितली जाते की, कबीरांचा जन्म काशी येथील विधवा-ब्राम्हणीच्या पोटी झाला व लोकनिंदे खातर तिने ते

बालक नहरतारा तलावावर टाकून दिले. तिथे निरु व नीमा हया दाम्पत्याने कबीरांचे पालनपोषण केले.

कबीरांच्या जन्माविषयी दुसरी अख्यायिका सांगितली जाते की, जेष्ठ पौर्णिमाला काशी येथील नहरतारा तलावतील कमलपुष्पावर एक तेजस्वी बालक जन्माला आले. हे पाहून निमा व निरु हया दाम्पत्याने ईश्वराचे वरदान म्हणून त्याचा सांभाळ केला.

कबीर लहाणपणापासूनच संतसंगती मध्ये बसत त्यामूळे मानवकल्याण, ईश्वरी भक्ती, ज्ञान प्राप्ती हया विषयी त्यांच्या मनात जिज्ञासा निर्माण झाली. त्यावेळी गुरुकडून ज्ञान प्राप्त होत असे म्हणून कबीरांनी गुरु करण्याचे ठरविले परंतू ते निम्न जातीतील असल्यामुळे त्यांना कोणी शिष्यत्व देत नव्हते. तेव्हा त्यांनी दक्षिणेतील विद्‌वान पंडित रामानंद यांना आपले गुरु मानले.

कबीररांच्या जाती-धर्माविषयी अनेक संभ्रम आहेत. कबीरांनी कधीही मी हिन्दू! मी मूसलमान! म्हणून सांगितले नाही. त्यामुळे त्यांचा धर्म कोणता होता हे समजू शकत नाही. मी काशीचा जुलाहा(कोष्टी)! असे फक्त ते म्हणत.

कबीरांच्या कौटुंबिक विषयी सांगतात कबीरपंथीय त्यांचे भक्त कबीरांना कुटूंब नव्हते ते अजीवन ब्रम्हचारी होते. अनेक विद्वानाच्या मते कबीर हे विवाहित होते. कबीरांनी आपल्या दोहे व पदामधून हिंदू व मुस्लीम धर्मातील अनिष्ठ रुढी, परंपरे व कर्मकांडा विरुध्द भाष्य केले त्यामूळे सनातनी लोकांनी त्यांना अनेक वेळा मारहाण सुध्दा केली. सुलतानी अत्याचारांना त्यांना सहन करावे लागत परंतू त्यांनी सदैव मानवकल्याणाचे कार्य निरंतर चालूच ठेवले.

कबीरांच्या मृत्युसंबंधीही अनेक संभ्रम आहेत. कबीरांचा मृत्यु मगहर येथे झाला. त्यांच्या मृत्युसंबंधी अख्यायिका कबीरपंथामध्ये सांगितली जाते. कबीरांच्या मृत्युनंतर त्यांचे भक्त हिंदू व मुस्लीम हयांच्या मध्ये त्यांच्या अंत्यक्रियेतून वाद निर्माण झाला. हिंदूचे म्हणने होते कबीर हे हिंदू होते म्हणून त्यांचे दहन करावे. तर मुस्लीमांचे म्हणने होते कबीर हे मुस्लीम होते त्यांचे दफन केले जावे. तेव्हा कबीरांच्या शवाजवळ दिव्यज्योती प्रकट झाली व शवाची राख झाली. हिंदूनी व मुस्लीमांनी हया राखेचे आपल्या पध्दतीने अंत्यसंस्कार केले.

अजीवन मानवकल्याण व मानवामानवातील भेदा नष्ट करण्यासाठी लढणा-या कबीरांनी आपले विहित कार्य पूर्ण झाले वाटते कारण, आज अनेक धर्मिय, जातीय लोक कबीर हयांच्या विचाराने प्रेरित झालेले आहेत. समाजामध्ये असलेली विषमता, कर्मकांड व अंधश्रध्दा नष्ट होऊन समता, वैज्ञानिक दृष्टीकोन व मानवतेची मूल्य जोपासणारा ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण होत आहे.

श्यामसुदरदास-कबीरःजीवन-वृत्त राधाकृष्ण मुल्यांकन -माला मध्ये प्रकाशित निबंधसंग्रह आहे.

प्रस्तूत लेखात लेखकाने संत कबीर यांचे जीवनवृत्तांचा आढावा घेतला आहे. कबीर हयांच्या जीवनचरित्रा संबंधी सत्य कमी ज्ञात आहे. अपितु त्यांचा जन्म व मृत्यु संबंधित सत्यता उपलब्ध नाही.

चौदह सौ पचपन साल गह, चंद्रवार एक ठाठ गए

जेठ सुदी रसायत को पूरनमासी, तिथी प्रगट भए

हे पद कबीरांचे प्रथम शिष्य धर्मदास यांचे आहे. हयावरुन कबीरांचा जन्म १४५६ मध्ये ज्येष्ठ शूक्ल पोर्णिमेला झाला.

संत कबीर सिकंदर लोदीच्या शासनकाळात होते. व त्याच्यांमुळे काशी सोडून मगहर जावे लागले व तिथेच त्यांचा इ.स.१५७५ मध्य, वयाच्या ११९ वर्षी मृत्यू झाला.

ज्याप्रमाणे कबीरांचा जन्म-मृत्यु संबंधित वादविवाद आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्या माता-पिता कोण या संबंधित सुध्दा सत्यता प्राप्त नाही. काशी येथील विधवा ब्राम्हणीच्या पोटी जन्म झाला व निमा-निरु हया कोष्टी दाम्पत्यामार्फत त्यांचे पालन-पोषण झाले असे काहींचे मत आहे.

तू ब्राम्हण,मैं काशी का जुलाहा, चीन्हि न मोर गियाना

हया पदावरुन असे लक्षात येते की, कबीर स्वतःला काशीचे रहिवाशी व कोष्टी (जुलाहा) मानत.

संत कबीरांचे कौटुंबिक जीवनाविषयी जाणून घेण्यास पुढील पदाद्वारे मदत होईल

रे या मैं क्या मेरा तेरा, लाज न मरहिं कहत घर मेरा

कहत कबीर सुनहु रे लोई, हम तुम बिनति रहेगा सोई

या वरुन असे समजते की कबीरांचे पत्नीचे नाव लोई होते त्याच बरोबर त्यांना कमाल व कमाली ही अपत्य सुध्दा होती.

कबीरांच्या अंत्यक्रिये विषयी एक विलक्षण गोष्ट प्रसिध्द आहे. हिंदू कबीरच्या शवाचे अंत्यसंस्कार करु इच्छित होते आणि मुसलमान कबरांना दफन करू इच्छित होते. याचे पर्यावसण हिंसक कृत्यात झाले. तेव्हा

आकाशवाणी झाली आणि कबीरांचे अर्धे शरीरावर अंत्यसंस्कार करण्यात आले व अर्धे शरीर दफन करण्यात आले.

प्रा. विजयेन्द्र स्नातक - मानवतावादी कबीर संत कबीर वरील गौरव ग्रंथातील लेखः-

प्रस्तूत लेखात लेखकाने संत कबीर यांचे मानवतावादी भूमिकाचा आढावा घेतला आहे.

भारतवर्षातील मध्यमयुगीन इतिहासातील महत्वपूर्ण घटना भक्ती आंदोलन आहे. भक्ती आंदोलनातील प्रमुख पक्षधर म्हणून संत कबीरांचे नामनिर्देशन केले जाते. कबीरांनी मानवतावादाच्या उन्मेषणासाठी व्यापक प्रयत्न केले.

संत कबीरांनी मानवा-मानवातील भेद मिटविण्यासाठीच अजीवन लढत राहिले. मानवतेला बाधक वर्णव्यवस्था, जातियता, धार्मिकता व समाजातील उच्च-नीच्च हा भेद व्यवसाय आणि धंद्याच्या आधारावर केले जात. कबीरांनी या भेदाला आव्हान देत अजन्म आपल्या कोरी (जुलाहा) व्यवसायांचा स्विकार केला.

सुखिया सब संसार है, खावै अरु सोवै

दुखिया दास कबीर है, जागै अरु रोवै

कबीरांनी दुसऱ्यांच्या सुखासाठी आपल्या जीवनात दुःखाचा (कष्टा) स्विकार केला. समाज प्रबोधनासाठी आपले जीवन व्यतीत केले. त्यांच्या शोक-विलाप स्वतःसाठी नव्हता तर समस्त संसाराच्या कल्याणासाठी होता.

जो तू बांमन बंमनी जाया, तौ आन बाट है क्यों नही आया

जो तू तुरक तुरकनी जाया, तौ भीतर खतना क्यों न कराया

आपल्या स्पष्ट व सदैव कबीरांनी समाजातील अनिष्ठ चाली रिती, रुढी-परंपरा, कर्मकांड, भेदाभेदाला विरोध केला. त्यांच्यात मानवतावादाचे ध्येय होते. की भेदरहित,शोषणरहित, ज्ञानपरायण समाजाची स्थापना होय.

२१ वे शतक हे तंत्रज्ञानाचे युग मानले जाते. तंत्रज्ञानाच्या विकासामूळे संपूर्ण जग हे Global Village बनले आहे. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे मानव हा सुखासीन बनला आहे. २१ व्या शतकाची काळी छाया म्हणजे बेकारी, भ्रष्टाचार, भाषावाद, प्रांतवाद, चंगळवाद, जातिय दंगली, गुन्हेगारी, आतंकवाद,पर्यावरणविषयक समस्या, एड्सचा विळखा इ. समाजचित्रावरुन आपण विकासाच्या दिशेने जात आहोत किंवा अधोगतीच्या पतनाच्या दिशेने.

ज्ञानाचा प्रसार झाला आहे. ज्ञानाधिष्ठित समाजाची स्थापना होत आहे. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत विविध योजना राबविल्या जात आहे. परंतू शिक्षण घेतले म्हणजे-व्यक्तीचा सर्वांगिण विकास झाला का आजही समाजात परस्पर असुरक्षिततेची अविश्वासाची भावना वाढीस लागली आहे. समाजातील ही सुरक्षितता दूर करण्याचे सामर्थ्य संत कबीरांच्या वाणीत आहेत.

संत कबीरांनी मध्ययुगाच्या काळात सर्वप्रथम वैज्ञानिक दृष्टीकोन आंगीकारला. समस्त मानव जातीच्या कल्याणाचा-प्रेमाचा मार्ग कबीरांनी दिला. धर्म, जाती, कर्मकांड हया पेक्षा माणूस मोठा असल्याचे प्रतिपादन केले. सर्व मानव हे इश्वराचे लेकरे समान त्यांनी मानले.

भगवान बुध्द, वर्धमान महावीर, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत नामदेव, संत तुकाराम हयांच्या प्रमाणेच संत कबीरांनी मानवतेची शिक्षा दिली.

सुमझ देख मन मीत पियरवा,

आसिक होकर सोना क्या रे

पाया दो तो दे ले प्यारे

पाय पाय फिर खोना क्या रे

जब अँखियन में नींद घनेरी,

तकिया और बिछौना क्या रे

कहै कबीर प्रेम का मारा,

सिर देना तो रोना क्या रे

कबीर समाजाला जागृत होण्याचा उपदेश करतात. विषय सुखांच्या आधिन होऊन समाजविमुख होऊ नको. तर झोपेतून जागा हो. फक्त घेणेच योग्य नाही तर आपण ही समाजाला, राष्ट्राला आणि या जगाला काही देणे आहोत. आर्थिक, सामाजिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विकास शक्य आहे. आणि त्याचा एकमेव मार्ग प्रेम.

कबीरांनी अखिल मानवतेच्या उन्नतीसाठी दया, क्षमा, परोपकार, सहिष्णूता, समता, बंधूता आदी मूल्यांचा पूरस्कार केला. हया मार्गानेच मानवतावादी मूल्यांचे दृष्टीकरण करता येईल.

१.२ समस्या विधानः-

"संत कबीरांचे मानवतावादी शिक्षण - एक अभ्यास".

१.३ संशोधनाची गरजः-

माहिती तंत्रज्ञानामुळे ज्ञानाचा स्फोट झाला. जगाचे अंतर हे कमी झाले (Global Village) व्यक्ती एका ठिकाणाहून आपल्या पेक्षा करोडो मैल दूर व्यक्तीशी संपर्क साधू शकतो. परंतू आपल्या जवळच्या माणसापासून दूर चालला आहे. मानवी नातेसंबंध,सामाजिक एकोपा, राष्ट्रीय एकात्मता, मानवी मूल्य पार केले आहेत.

१.४ संशोधनाचे महत्वः-

कबीरांचे मानावाची संकल्पना, शैक्षणिक विचार, सामाजिक चिंतन, धार्मिक सहिष्णूतेचे प्रयत्न, संपूर्ण मानवतेच्या कल्याणचा अभ्यास प्रस्तूत संशोधनात करण्यात आलेला आहे.

प्रस्तूत संशोधनामूळे कबीरांचे तत्वज्ञान समजण्यास मदत होईल. कबीरांचे शैक्षणिक विचारज्ञान निर्मीती, ज्ञानाचा उपयोग व ज्ञानाधिष्ठित समाज निर्मीती व मूल्य संवर्धनात याचा फार मोठा उपयोग शिक्षणक्षेत्राला नक्कीच होईल.

कबीरांनी वेळोवेळी आपल्या वाणीने समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे. समाजातील अनिष्ठ रुढी, कर्मकांड व विषमतेला नष्ट करण्याचा प्रयत्न केला व समाजाला वैज्ञानिक दृष्टी देण्याचे कार्य केले त्यामुळे विषमता विरहित व ज्ञानसंपन्न समाज निर्माण होण्यास मदत होईल.

कबीरांनी मानवतावादाचे शिक्षण देण्यात आपले आयुष्य वेचले खऱ्या अर्थाने ते समाजशिक्षक होते. त्यामुळे शिक्षकांची समाजातील भूमिका समजून घेण्यास व आदर्श शिक्षक निर्माण करण्यास मदत होईल.

भारतीय संविधानातील मूल्य रुजविणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतील दहा गाभाभूत घटकांची पूर्तता करण्यासाठी व विश्वकल्याणासाठी संत कबीरांचे मानवतावादी शिक्षण अत्यंत महत्वपूर्ण होय.

व्हिजन-२०२० चे स्वप्नपूर्ण करण्यास नक्कीच कबीरांचे तत्वज्ञान व शिकवण उपयोगाला येईल.

१.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये:-

१. संत कबीरांच्या शिक्षण विषयक विचारांचा अभ्यास करणे.

२. संत कबीरांचे समाज विषयक विचारांचा अभ्यास करणे.

३. संत कबीरांचे मानवतावादी शिक्षणाचा अभ्यास करणे.

४. संत कबीरांचे मानवतावादी विचारांचा आजच्या काळातील शिक्षण पध्दतीत उपयुक्तता अभ्यासणे.

१.६ संशोधनाची गृहितके:-

१. संत कबीर यांच्या शैक्षणिक विचारांचा प्रभाव भारतीय शिक्षण पध्दतीवर पडलेला आहे.

२. संत कबीरांचे शिक्षण विषयक विचार उच्च दर्जाचे आहे.

३. संत कबीरांचे मानवतावादी शिक्षणाचा परिचय जनतेला झालेला नाही.

४. संत कबीर जरी मध्ययुगातील असतील तरीही त्यांचे विचार आजही उपयुक्त आहेत.

५. संत कबीरांचे विचार चिरकाल उपयुक्त आहेत.

१.७ संशोधनाची व्याप्ती:-

संत कबीर यांच्या कार्याची व्याप्ती व्यापक प्रमाणात आहे. संत कबीरांचे कार्य व योगदान तत्वज्ञान, काव्य, समाजप्रबोधन इ. क्षेत्रात उल्लेखनीय आहे. परंतू संशोधकाने फक्त संत कबीर यांचे शिक्षण विषयक विचार आणि मानवतावादी शिक्षणाचा अभ्यास विचार केला आहे.

अभ्यासाची व्याप्ती दोन घटकांशी संबंधीत आहे.

१. संत कबीरांचे शिक्षण विषयक विचार.

२. संत कबीरांचे मानवतावादाविषयी शिक्षण.

१.८ संशोधनाच्या मर्यादा:-

संशोधकाला संत कबीर यांच्या मानवतावादी शिक्षणाचा अभ्यास करतांना काही प्रमुख मर्यादांचा विचार करणे अपेक्षित आहे.

१. फक्त शिक्षण विषयक विचारांचा अभ्यास

२. फक्त मानवतावादी शिक्षणाचा अभ्यास

३. संबंधित संशोधन कार्यात संशोधकाला संशोधन करतांना प्राथमिक स्वरुपाच्या साधनांची माहिती पाहिजे त्या प्रमाणात उपलब्धता झाली नाही.

४. दुय्यम स्त्रोतांच्या उपलब्धतेवर मोठया प्रमाणात संशोधन कार्य केले आहे.

१.९ संज्ञेच्या संकल्पनात्मक व्याख्याः-

१. संत कबीरः-

१४ व्या शतकातील निगुर्ण भक्तीवादी कवी. हयांची भक्ती ही एकेश्ववरवादी होती. तत्कालीन परिस्थितीत आपल्या वाणीने समाज प्रबोधनाचे कार्य केले. आपल्या दोहा, साखी, रमैनी, उलंठबांसी व पदातून समाजातील अनिष्ठ रुढी-परंपरा, कर्मकांड, वर्णव्यवस्था, जातियता, उच्च-निच्च भेदभेदाला कडाडून विरोध केला.

२. मानवतावादः-

मानवी जीवनमूल्य ही अंतिम मूल्ये होत. हे मानवतावादाचे प्रथम सूत्र आहे. मानवाच्या हातातच त्याचे भवितव्य आहे. या जगातील त्याचे जीवन म्हणजे एक इतिहास. एतिहासिक परिस्थिती निर्माण करण्याची अथवा बदलण्याचे त्याला स्वातंत्र्य म्हणजे शक्ती आहे.

मानवच सर्व अस्तित्वाचा मानदंड आहे अशा प्रकारच्या विचारांनी प्रेरित झालेले आंदोलन मानवतावादी होय. आणि अशा विचारसरणीचे मूलगामी समर्थन करणारे तत्वज्ञान मानवतावाद होय.

(वैदिक संस्कृतीचा विकास पृ.क्र.४८४)

३. शिक्षणः-

मन, आत्मा व शरीर हया त्रयींचा त्याच्या उच्चतेपर्यंत विकास म्हणजे शिक्षण होय.

शिक्षणामध्ये आत्मसाक्षात्कार, सुफ गुणांचा विकास, सर्वांगिण विकास इ. समावेश होतो.

संज्ञेच्या कार्यात्मक व्याख्याः-

१. संत कबीरः-

संत मालिकेतील मेकमणी कबीर हयांच्या विचाराने समाजातील विषमता, कर्मकांड, अनिष्ठ, प्रथा, परस्परांना विरोध केला. मानवा-मानवातील प्रेमपूर्ण संबंधावर भर दिला.

२. मानवतावादः-

मानवाने मानवा सोबत मानवीय व्यवहार करणे म्हणजे मानवतावाद होय. त्यामध्ये मानवाच्या अध्यात्मिक, शारीरिक, मानसिक व भौतिक विकासाचा समावेश होतो.

३. शिक्षणः-

मन, आत्मा व शरीर हया त्रयींचा त्यांच्या उच्चते पर्यंतचा विकास म्हणजे शिक्षण होय. शिक्षणाद्वारेच मनुष्य योग्य-अयोग्य, चूक-अचूक, सत्य-असत्य, हा भेद जाणून घेऊ शकतो.

४. अभ्यासः-

अभ्यास(अभि+यास) अभ्यास या संस्कृत शब्दाचा अर्थ भोवती बसून गुरुच्या सानिध्यात बसून अध्ययन करण्याची प्राचीन पध्दती.

अभ्यासाचा दुसरा अर्थ सराव सुध्दा होतो.

(म.बा.कुंडले)

१.१० संशोधनाची कार्यपध्दतीः-

संत कबीरांचे मानवतावादी शिक्षण - एक अभ्यास हा संशोधनचा विषय होय. संशोधनाचा विषय निश्चित करुन संत कबीर यांच्यावर असलेली

सर्व पुस्तके, पेपर मध्ये आलेले लेख, संशोधन ग्रंथ, इंटरनेट वरील लेख हया सर्व लिखीत गोष्टीचे संकलन करण्यात आले.

कोणत्याही विषयाचे संशोधन करीत असतांना विविध संशोधन पध्दतीचा वापर केला जातो. संशोधनाच्या प्रमुख पध्दती पुढील आहेत.

१. ऐतिहासिक संशोधन पध्दती

२. वर्णनात्मक संशोधन पध्दती

३. सर्वेक्षण संशोधन पध्दती

या ठिकाणी संशोधन करीत असतांना संशोधकाने घ्ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

ऐतिहासिक संशोधन पध्दतीः-

ज्या पध्दतीचा अवलंब केल्याने इतिहासाची यथार्थ ओळख होते, त्या पध्दतीला ऐतिहासिक संशोधन पध्दती असे म्हणतात.

शैक्षणिक क्षेत्रात ऐतिहासिक संशोधनाचे महत्वः-

१. शाळेच्या आणि शैक्षणिक संस्थांच्या इतिहासाचे ज्ञान हा शिक्षक आणि प्रशासक यांच्या व्यावसायिक शिक्षणाचा एक महत्वपूर्ण भाग आहे.

२. शिक्षणाच्या इतिहासामुळे विविध प्रकारचे अवडंबर व चमत्कारिक पध्दती कळतात. व तेवढेच शैक्षणिक सुधारणेच्या दृष्टीने आवश्यक असते.

३. वर्तमानकालीन शैक्षणिक समस्यांची त्यांची उत्पती आणि वाढ कशी झाली हे कळल्याने निपक्षपातीपणे व सहानुभूतीपूर्वक विचार करता येतो.

४. शिक्षणाच्या इतिहासामूळे सामाजिक संस्थाचे कार्य् कशी बदलत गेली आणि शिक्षणाचा आधार व नियंत्रण साध्या व स्थानिक व्यवस्थेतून केंद्रित आणि समिश्र व्यवस्थेत कसे बदल होत गेले याची स्पष्ट कल्पना होते.

५. शाळेची बरेचशी कार्य परंपरागत असते शिक्षक आणि प्रशासक यांच्या कार्याचे स्वरुप प्रतिबंधात्मक आणि परिचित पध्दतीच्या बाबतीत गैरसमज वाढविणारे असते अशा वेळी गैरसमज दूर करण्या करीता शिक्षणाचा इतिहास हे एक प्रभावी उत्तर आहे.

६. ऐतिहासिक संशोधन ही भविष्यकालीन उपाययोजना करण्यासाठी उपयुक्त आहे.

१.११ संशोधनाची साधनेः-

प्रस्तूत संशोधनासाठी प्राथमिक स्त्रोत म्हणून संत कबीरांच्या दोहे, पद, साँखी, रमैनी संकलीत असलेली कबीर ग्रंथावलीचा उपयोग केला आहे तर दुय्यम स्त्रोत म्हणून त्यांच्या विषयी इतरांनी लिखीत ग्रंथ, लेख यांचा उपयोग केला आहे.

माहितीचे संकलनः-

प्राथमिक व दुय्यम स्त्रोताच्या आधारे माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करुन माहिती संकलीत केली आहे.

१.१२ प्रकरणीकरणः-

प्रस्तूत संशोधनाचे प्रकरणीकरण पुढील प्रमाणे करण्यात आले.

प्रकरण पहिलेः- प्रस्तावना

पहिल्या प्रकरणात संशोधनाची पार्श्वभूमी, समस्या विधान, संशोधनाचे महत्व, व्याप्ती, मर्यादा याबाबत स्पष्टीकरण केले आहे.

प्रकरण दुसरेः- संबंधित साहित्याचा आढावा

दुस-या प्रकरणामध्ये संबंधीत संशोधन साहित्य व संबंधित संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आला.

प्रकरण तिसरेः- संशोधनाची कार्यपध्दती

तिस-या प्रकरणामध्ये संशोधन कार्यकरिता वापरण्यात आलेली कार्यपध्दती तसेच या संशोधनाची साधने स्पष्ट करण्यात आली आहेत.

प्रकरण चौथेः- माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

या प्रकरणात संत कबीर यांचे मानवतावादी शिक्षण विषयक विचार स्पष्ट केले आहे.

प्रकरण पाचवेः- सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

या प्रकरणामध्ये प्राथमिक व दुय्यम स्त्रोताच्या अभ्यासातून प्राप्त झालेले निष्कर्षाचा व त्यांच्याशी केलेल्या शिफारशी आणि पुढील संशोधनासाठी विषय नमुद करण्यात आले आहेत.

संदर्भग्रंथ सूची

1. Best, John. W., (1983), Research in Education, New Delhi; Prentice Hall of India Pvt. Ltd.
2. Buch, M.B.(1988-92) Fifth survey of Research in Education, New Delhi, NCERT.

5. डॉ. भगवत स्वरुप मिश्र, (सन १९८७) कबीर ग्रंथावली, विनोद पुस्तक मंदिर, आग्रा - २.
६. डॉ. श्यामसुंदर दास, (१९६१) कबीर ग्रंथावली, विदया विहार प्रकाशन, कानपूर.
७. डॉ. सुखदेव सिंह, (१९६८) कबीर बीजक, राजकमल प्रकाशन, दिल्ली.
८. डॉ. राजकूमार वर्मा (१९८६) संत कबीर, आनंद प्रकाशन, दिल्ली.
९. हजारीप्रसाद द्विवेदी (१९७१) कबीर, राजकमल प्रकाशन, प्रा.लि. नेताजी सुभाष मार्ग, नई दिल्ली.
१०. डॉ. कृ.ज्ञा.भिंगारकर (१९८९) संत साहित्य के क्षितिज-कबीर और ज्ञानेश्वर, विदया विहार प्रकाशन, कानपूर-१२.
११. विजयेन्द्र स्नातक (१९६५) कबीर, राधाकृष्ण प्रकाशन प्रा.लि. दरियागंज, नवि दिल्ली.
१२. जोशी, टी.एल. वैदिक संस्कृतीचा विकास.
१३. नामदेव एवं कबीर साहित्य का शोध - परक अध्ययन-(लोक जागरण विशेष संदर्भ में) प्रा. जाधव एस.एस.
14. ISSAC A. Izekiel, Kabir The Great Mystic (Kabir wikipedia)

संशोधक
बोधनकर मनोजकुमार अंबादास

मार्गदर्शक
डॉ. शिराढोणकर
प्राचार्या,
रावसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय, पाचपिंपळी